# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 13 December 2025
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – १३ डिसेंबर २०२५ सायंकाळी ६.१०

****

- मुंबईतल्या जुन्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी सरकारची हाऊसिंग फॉर ऑल योजना
- स्वायत्त संस्थांच्या कार्यपद्धतीत पारदर्शकतेसाठी मार्गदर्शक तत्त्वं निश्चित करण्याचा शासनाचा निर्णय
- विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचा उद्या समारोप;अंतिम आठवडा प्रस्तावातून विरोधकांची सरकारवर टीका

आणि

- माजी राज्यपाल शिवराज पाटील चाकूरकर यांच्या पार्थिव देहावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

****

मुंबईतल्या जुन्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी हाऊसिंग फॉर ऑल योजना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केली. याबाबतचं निवेदन त्यांनी विधीमंडळात सादर केलं. या योजनेत आर्थिकदृष्ट्या मागास घटकांसाठी ३०० चौरस फुटापर्यंतचा एफएसआय विनामूल्य तर अल्प उत्पन्न गटासाठी ६०० चौरस फुटापर्यंतच्या सदनिकेची पुनर्बांधणी विनामूल्य करण्याची तरतूद या योजनेत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

झोपडपट्टीधारकांसाठी जमिनीच्या मालकीहक्काचे पट्टे दिले असून, अडीच लाख लोकांना त्याचा लाभ होईल, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. नागपुरात वार्ताहरांशी बोलतांना मुख्यमंत्र्यांनी ही माहिती दिली, ते म्हणाले –

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

राज्यात प्रक्रिया उद्योग उभे राहण्याची गरज मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली आहे. नागपूर इथं सीआयआय अन्न प्रक्रिया परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते आज बोलत होते. या परिषदेमधे विविध विषयांवर चर्चा होईल, तसंच प्रक्रिया उद्योग क्षेत्रात प्रगती करण्यासाठी धोरणं आखली जातील, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ज्या क्षेत्रात मूल्यवर्धन आहे तिथे शेतकरी बाजारावर प्रभाव टाकू शकतात, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

****

बार्टी, सारथी, महाज्योती आणि अमृत, यासारख्या स्वायत्त संस्थांच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता आणूनच योग्य निकषांसह मार्गदर्शक तत्त्वं निश्चित केली जातील, असं उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. ते आज विधानसभेत डॉ. नितीन राऊत यांच्या प्रश्नावर उत्तर देत होते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल-वंचित घटकांतल्या, परदेशात शिक्षण घेण्याची क्षमता नसलेल्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना प्राधान्यानं मदत करण्याची सरकारची भूमिका असल्याचंही पवार यांनी सांगितलं. मात्र संशोधनासाठी दिली जाणाऱ्या शिष्यवृत्तीची पात्रता आणि उपयोगिता तपासली जाणार असल्याचं पवार यांनी सांगितलं. ते म्हणाले -

**बाईट – अर्थमंत्री अजित पवार**

****

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत e-KYC प्रक्रियेतील चुका सुधारण्यासाठी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर योजना ही महिला सक्षमीकरणाच्या हेतूनं राबवण्यात येत आहे. e-KYC प्रक्रिया अधिक सुलभ आणि सोपी असावी आणि जास्तीत जास्त लाडक्या बहिणींना या योजनेचा लाभ मिळावा यासाठी महिला आणि बालविकास विभाग कटिबद्ध असल्याचं सरकारनं म्हटलं आहे.

****

कृषी उत्पन्न पणन सुधारणा विधेयक २०२५ आज विधानसभा तसंच विधानपरिषदेत मंजूर झालं. या विधेयकात प्रथमच राज्यात राष्ट्रीय महत्वाचा बाजार- युनिफाईड सिंगल ट्रेडिंग लायसन्स आणि राष्ट्रीय कृषी बाजार या शेतकरी हिताच्या संकल्पना कायदेशीर रूप दिलं आहे. पणन मंत्री जयकुमार रावल यांनी हे विधेयक दोन्ही

सभागृहात मांडलं आणि ते मंजूर करण्यात आलं. शेतमालाला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर जलद गतीनं पुरवठा साखळी विकसित करून बाजारपेठ मिळवून देण्यासाठी हा कायदा महत्त्वाचा आहे.

****

विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचा उद्या समारोप होत आहे. विरोधी पक्षांच्या वतीने विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्ताव मांडला. राज्यातील शेतकऱ्याच्या आत्महत्या हे महायुती सरकारचं पाप असल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली. कृषी क्षेत्रातील निधीचा अपव्यय, कायदा आणि सुव्यवस्था, तसंच भ्रष्टाचाराच्या मुद्द्यांवरून वडेट्टीवार यांनी सरकारवर कडाडून टीका केली. विदर्भ वैधानिक मंडळाला त्वरित मान्यता द्यावी, अशी मागणीही वडेट्टीवार यांनी अंतिम आठवडा प्रस्तावाच्या भाषणात केली.

****

संसदेवर दहशतवादी हल्ला झाल्याला आज २४ वर्ष पूर्ण झाली. या हल्ल्यात संसदेचं रक्षण करताना हौतात्म्य पत्करलेल्या सुरक्षा रक्षकांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी श्रद्धांजली वाहिली असून या शूरवीरांनी दाखवलेलं धैर्य, त्यांची कर्तव्यनिष्ठा देशाच्या राष्ट्रभावनेला सदैव मार्गदर्शन करत राहील, असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी, आणि इतर नेत्यांनी आज संसद भवन परिसरात शहिदांना श्रद्धांजली अर्पण केली.

****

अमरावती इथल्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेचा ‘डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार’ यंदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाहीर झाला आहे. राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी आज अमरावती इथं पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. पाच लाख रुपये, स्मृतिचिन्ह, मानपत्र, असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

शेतीक्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी महिलेला ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दिलेल्या निधीतून ‘शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार’, तर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निधीतून पुरूष शेतकऱ्याला ‘शरद जोशी उत्कृष्ट पुरूष

शेतकरी पुरस्कार' देण्यात येणार आहे. एक लाख रुपये, स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र असं या दोन्ही पुरस्कारांचं स्वरूप आहे.

****

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी राज्यपाल शिवराज पाटील चाकूरकर यांच्या पार्थिव देहावर आज शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. लातूर शहराजवळील वरवंटी इथं लिंगायत समाजाच्या रितीरिवाजांनुसार चाकूरकर यांच्यावर समाधीसंस्कार करण्यात आले. यावेळी पोलीस दलातर्फे हवेत फैरी झाडून चाकूरकर यांना मानवंदना देण्यात आली. लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे, केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह आजी-माजी खासदार आणि आमदार तसंच मोठ्या संखेनं नागरिक यावेळी उपस्थित होते. बिर्ला तसंच खरगे यांनी यावेळी चाकूरकर यांना या शब्दांत श्रद्धांजली अर्पण केली.

**बाईट-लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला आणि खासदार मल्लिकार्जून खर्गे**

****

राज्यातल्या रस्त्यांच्या कामासाठी दीड लाख कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपुरात ही माहिती दिली.

****

भारत आणि दक्षिण आफ्रिकेत सुरु असलेल्या टी-२० क्रिकेट मालिकेतील तिसरा सामना उद्या धर्मशाला इथं खेळवला जाणार आहे.पाच सामन्यांच्या या मालिकेत दोन्ही संघ १-१ सामना जिंकून बरोबरीत आहेत.

****

राज्यात आज सर्वात कमी सात अंश सेल्सियस तापमान जळगाव इथं नोंदवलं गेलं. त्या खालोखाल अहिल्यानगर इथं साडे सात अंश, पुणे तसंच नाशिक इथं साडे आठ अंश तापमानाची नोंद झाली. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर इथं ११ पूर्णांक सात दशांश सेल्सियस तापमानाची नोंद झाली.

****